वाचा: १) संचालनालयाचे स्थायी आदेश क्र.४/२०१६, दि.३०/११/२०१६.
२) संचालनालयाचे स्थायी आदेश क्र.३/२०१७, दि.०३/०२/२०१७.

---

स्था.१८/ब/अहवाल शाखा/वलेप अहवाल/न.क्र.१८३-२/

**संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**महाराष्ट्र राज्य,**
**कोंकण भवन, ६ वा मजला,**
**नवी मुंबई -४०० ६१४**

## स्थायी आदेश क्र. ०४/२०१८, दिनांक : ३०/०७/२०१८

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल निर्गमनाबाबत.

**प्रस्तावना:**

स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडून जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व नगरपंचायतीचे लेखापरीक्षण केले जाते. मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम ८ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण पुर्ण झाल्यानंतर ३ महिन्यापेक्षा उशिरा नसेल अशा मुदतीत लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करणे आवश्यक आहे. तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४० (१) नुसार ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण पुर्ण झाल्यानंतर २ महिन्यांच्या आत लेखापरीक्षण अहवाल सर्व संबंधितांना निर्गमित करणे आवश्यक आहे. यानुसार वाचा क्र.२ नुसार ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवाल कार्यालयास अहवाल सादर करण्याची पध्दती विहित करण्यात आली आहे. वाचा क्र.२ नुसार जे लेखापरीक्षक ग्रामपंचायतींचे प्रारुप अहवाल विहित मुदतीत जिल्हा कार्यालयास सादर करणार नाहीत अशा लेखापरीक्षकांना मासिक सभेच्या पुढील २ दिवस (दि.४ व दि.५) लेखापरीक्षणाचे कामकाज न देता जिल्हा कार्यालयात उपस्थित राहून लेखापरीक्षणाचे कामकाज पूर्ण करुन देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

माहे जून अखेर लेखापरीक्षणाचा आढावा घेतला असता ४२८४ ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवाल विहित मुदतीत निर्गमित न झाल्याचे निर्दशनास आले आहे. तसेच जिल्हा परिषद विभाग, पंचायत समिती, नगरपालिका, नगर पंचायती यांचे काही लेखापरीक्षण अहवाल विहित मुदतीत निर्गमित न झाल्याचे निर्दशनास येते.

**आदेश:**

ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवाल निर्गमनाबाबत वाचा क्र. १ व २ अन्वये दिलेल्या तरतूदींचे काटेकोरपणे पालन करावे. ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण अहवाल विहित मुदतीत निर्गमित न करणाऱ्यास जबाबदार असलेल्यांविरुध्द विभागीय सहसंचालक यांनी प्रशासकीय कार्यवाही करावी.

जिल्हा परिषद विभाग, पंचायत समिती, नगरपालिका व नगर पंचायती यांचेबाबत संबंधित घटकाचे लेखापरीक्षण पूर्ण झाल्यावर लेखापरीक्षण पथकाने लगतचे कार्यालयीन कामकाजाचे दोन दिवस मुख्यालयात उपस्थित राहून लेखापरीक्षण प्रारुप अहवाल तयार करण्याबाबत अनुषंगाने कामकाज करावे. सदर कार्यालयीन कामकाजाचे दोन दिवस श्रमदिनातून वगळण्यात यावे. जिल्हापरिषद विभाग, पंचायत समिती, नगरपालिका व नगर पंचायती यांचे लेखापरीक्षण अहवाल विहित मुदतीत निर्गमित न झाल्यास पथक प्रमुख व अहवालाचे अंतिमीकरण करणारा अधिकारी यांची संयुक्त जबाबदारी राहील.

**(प्रताप मोहिते)**
संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत:- १. सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोंकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
२. सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, जिल्हा कार्यालय.